**कार्यालयीन उपस्थिती शासकीय वाहन चालक**
**यांच्या उपस्थितीच्या तपासणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- समय १००६/७११/१८ ( र.व.का.)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ ऑगस्ट,२००६.

**वाचा : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक - समय-१००६/ प्र.क्र.३३/२००६/१८(र.व.का.), दि.१३ जून, २००६.**

**परिपत्रक**

ज्या शासकीय कार्यालयात कार्ड पंचिंग प्रणाली बसविली आहे तेथील प्रत्येक अधिकारी /कर्मचारी यांनी कार्यालयात प्रवेश करतांना व कार्यालय सोडताना कार्ड पंच करावे व जे अधिकारी /कर्मचारी कार्ड पंच करणार नाहीत अशा अधिकारी /कर्मचारी यांना त्या दिवसाचे वेतन न देण्याची कार्यवाही विभाग / कार्यालय प्रमुखाना करण्याच्या सुचना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः-समय-१००६/प्र.क्र.३३/ २००६/१८ ( र.व.का.) दिनांक १३ जून,२००६ अन्वये देण्यात आल्या आहेत. मात्र शासकीय अधिकाऱ्यांच्या गाडीवर कार्यरत असणाऱ्या वाहनचालकांना संबधित अधिकाऱ्यांच्या सोयीनुसार वाहनचालकांना आपल्या कामकाजाची वेळ ठरविणे अपेक्षित असल्यामूळे वाहनचालकांना विहीत वेळेनुसार कार्ड पंचिंग करणे शक्य होत नाही अशी अडचण शासकीय वाहनचालक संघटनेने शासना समोर मांडली. सदरील संघटनेच्या या संदर्भात केलेल्या सुचनानुसार शासन या बाबत पूढील प्रमाणे आदेश देत आहेत.

२. शासकीय वाहनचालक ज्या अधिकाऱ्यांकडे कार्यरत आहेत अशा वाहनचालकांना ज्या दिवशी शासकीय कामकाजास्तव कार्ड पंचिंग करणे शक्य होणार नसेल अशा दिवसांच्या उपस्थितीबाबतचा अहवाल ज्या अधिकाऱ्याकडे ते कार्यरत आहेत त्या अधिकाऱ्याच्या शिफारशीसह संबंधित विभाग / कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्याकडे दर आठवड्याच्या अखेरीस देणे संबंधित वाहन चालकास बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्या वाहनचालकाना त्या दिवसांचे वेतन न देण्याची कार्यवाही विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी करावी. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,

(क्र.मा.प

शासन - ६३ ...
१७ ... २००६

रोटा/एम-१३०६(५,००० -०९-२००६)-३

क्रमांक - समय-१००६/प्र.क्र.३३/२००६/१८ (र.व का.), दि.१३ जून, २००६ मधील इतर सूचना तशाच लागू राहतील.

३. सदरील शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००६०८१८१५५०४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशाने,

( वि.रा.घड्लेकर )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव (५ प्रती)
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती)
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती)
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
*५. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. शासनाचे मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
*८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई,
*९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
*१०. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय,
*११. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
*१२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*१३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (५ प्रती)
१४. सर्व मंत्रालयीन विभाग,
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
१६. सर्व विभागीय आयुक्त,
१७. सर्व जिल्हाधिकारी,
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९. मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२१. निवड नस्ती (कार्यासन १८)

जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
शाखा -
आवक नं.
12 SEP 2006
नोंद वही नं.
एन–1305 –13